दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● बुधवार २६ जून २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक ३१८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# शाळेच्या आवारातील टपऱ्यांवर कारवाई करणार - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आदेश

**दोघांना पोलीस कोठडीL3 बार पार्टी प्रकरणात ठोंबरे आणि करण मिश्रा यांना २९ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. ड्रग्सचे सेवन केल्याप्रकरणी पुणे पोलिसांनी त्यांना अटक केली होती. रविवारी झालेल्या पार्टीमध्ये ड्रग्सचे सेवन केल्याचा आरोप या दोन जणांवर आहे. आज दुपारी या दोघांना पुणे सत्र न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने त्यांना २९ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. यापैकी एकाला मुंबईतून तर दुसऱ्याला पुण्यातून पुणे पोलिसांनी ताब्यात घेतलं होतं. दोन्ही तरुणांचे रक्ताचे नमुने तपासले जाणार आहेत.**



**लातूर/प्रतिनिधी**
पुण्यातील ड्रग्ज प्रकरण चांगलंच तापलं आहे. विरोधकांनी हा मुद्दा लावून धरला आहे. पुण्यातील बेकायदेशीर बार आणि पबवर कारवाई करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. जे बार आणि पब बेकायदेशीर आहेत त्यांच्यावर बुलडोजर चालवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर पुणे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी या पब आणि बार विरोधात कारवाई केली आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांनी बोलताना सांगितले की, 'पुणेच नाही तर महाराष्ट्रात जिथे जिथे ड्रग्ज विकत असतील अशा लोकांना सोडणार नाही. त्यांना जेलमध्ये टाकलं जाईल. अशा हॉटेल, टपऱ्या असतील सर्वावर तोडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.' मुख्यमंत्र्यांनी म्हटले की, 'कुणाला पाठिशी घालण्याचं काम केलं तरी सोडणार नाही. पुणे पोलीस आयुक्तांना आदेश दिले आहेत. ड्रग्जमुळे युवा पिढी चुकीच्या मार्गावर जात आहेत. शाळेच्या आजुबाजुला जिथे टपऱ्या असतील त्या उद्धवस्त करण्याचे आदेश दिले आहेत. ड्रग्ज विकणाऱ्या गँगना सोडणार नाही. असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.'काँग्रेस आक्रमक
पुण्यातील ड्रग्स प्रकरणानंतर काँग्रेस चांगलीच आक्रमक झाली आहे. पुण्यातील गुडलक चौकात युवक काँग्रेस तर्फे आंदोलन करण्यात आलं. पुण्यात होणाऱ्या ड्रग्स पार्टीच्या विरोधात युवक काँग्रेसने आंदोलन केलंय. पोलीस प्रशासन आणि राज्य सरकारच्या विरोधात युवक काँग्रेसचे हे आंदोलन होते.

## श्री सिद्धिविनायक गणेश मंदिर येथे डॉ भीष्म दिगांबर झुंजारे यांच्या वतीने महाप्रसाद



नायगाव/प्रतिनिधी
नायगांव शहरातील श्री सिद्धिविनायक गणेश मंदिर येथे आज दिनांक २५ जुन रोजी संकट चतुर्थी निमित्त व शेतकऱ्यांनी पेरणी केली पण पाऊस पडत नसल्याने पाणी भरपूर पडून शेतकरी सुजलाम सुफलाम हो यासाठी डॉ झुंजारे सर हे श्री सिद्धिविनायकाला साकडे घातले व भव्य महाप्रसादाचे आयोजन केले डॉ झुंजारे सर हे धार्मिक असून समाजाच आपण काही देणं लागतो या भावनेतून त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबवतात वृक्ष लागवड, पशु पक्षी यांना पाणवठे तयार करून पाणी पुरवठा करतात, गोरगरीब जनतेला सदैव मदतीसाठी तत्पर असतात त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले जाते आज त्यांच्या सहपत्नीक अभिषेक व आरती संपन्न झाल

## गुरू गौरव पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक मनोहर गादेवार सर सेवानिवृत्त

**नायगांव/प्रतिनिधी**
नायगांव तालुक्यातील सुजलेगांव येथील गुरू गौरव पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक हे जि प प्रा शाळा सुजलेगांव येथे ३६ साहा महिने सेवा पूर्ण करून ३१ जुन रोजी सेवानिवृत्त होत आहेत मनोहर गादेवार सर यांचा जन्म एका शेतकरी कुटुंबात ०१/०६/१९६६ सुजलेगाव येथे झाला त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातील जि प प्रा शाळात तर सातवी ते १० पर्यंतचे शिक्षण नायगांव जनता हास्कुल नायगांव येथे झाले मनोहर गादेवार यांनी लहानपणापासून हुशार विद्यार्थी म्हणून त्यांची ओळख होती गादेवार सर सुजले गाव ते नायगाव पायी प्रवास करून शिक्षण घेतले दहावी बारावी विशेष प्रवीण उत्तीर्ण झाले व त्यांना १९८६ रोजी व त्यांना जि प प्रा शाळांमध्ये शिक्षक म्हणून नोकरी मिळाली सर हे धार्मिक विचारवंत साहित्यिक कवी उत्तम सूत्रसंचालन मनमिळावू स्वभाव आदर्श शिक्षक गुरु गौरव पुरस्कार प्राप्त आधी त्यांना परिसरात ओळख होती मनोहर गादेवार सर यांना तालुकास्तरीय गुरु गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते तर जिल्हास्तरावर पुन्हा एकदा गुरु गौरव पुरस्कार त्यांना प्राप्त झाला. त्यांचे जीवन चरित्र अतिशय प्रमाणिक अभ्यासू उपक्रमशील शिक्षक म्हणूनही त्यांची ओळख होती विद्यार्थी घडवण्यासाठी ते अहोरात्र परिश्रम घेत असत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा विद्यार्थी हुशार व्हावं हे त्यांचं ध्येय होतं नोकरी करण्याचे कधीच कुचराई केले नाहीत त्यांना त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करणारे बालाजी कदम सर हे होते त्यांनी त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून अहोरात्र परिश्रम घेतले प्रमाणिक मनमिळावू शिक्षक विद्यार्थ्यांच्या हृदयात सदैव घर केलेले आदर्श गुरु गौरव पुरस्कार प्राप्त शिक्षक मनोहर गादेवार सर हे 31 जुन रोजी सेवानिवृत्त होत आहेत मनोहर गादेवार सर यांना सेवानिवृत्त नंतर काय असा प्रश्न विचारले असता त्यांनी समाजसेवा गोरगरीब जनतेची सेवा देवधर्म यासह व्यवसाय करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली



## धारूर येथे राजर्षी शाहु महाराज जयंती निमित्त रक्तदान शिबीर व विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन.

किल्लेधारूर/प्रतिनिधी धारूर शहरात राजश्री शाहु महाराज जयंती उत्सव समितीचे वतीने दि.२६ जुन रोजी विवीध सामाजीक उपक्रम व रक्तदान शिबीराचे आयोजन करून राजश्री शाहू महाराजाची जयंती साजरी करण्यात येणार असून सर्व नागरीकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन उत्सव समितचे वतीने करण्यात आले आहे.

धारूर शहरात प्रतीवर्षा प्रमाणे याही वर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती समितीचे वतीने छत्रपती राजश्री शाहू महाराज यांची जयंती उत्साहात व विवीध कार्यक्रमांनी साजरी करण्यात येणार असुन राजश्री शाहू महाराज चौकात मान्यवरांचे हस्ते ध्वजारोहन व प्रतिमा पुजन करून जि. प. माध्यमिक शाळा धारूर येथे गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहीत्याचे वितरण करण्यात येईल ,येथील हुतात्मा स्मारकामध्ये रक्तदान शिबीराचे आयोजन सकाळी १०-०० करण्यात आले आहे. सामाजिक उपक्रम राबवून जयंती साजरी करण्यात येणार आहे या सर्व कार्यक्रमाला जास्तीजास्त संख्येने नागरीकांनी उपस्थित राहवे असे आवाहन उत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष बंडोबा सावंत


बीड-एकल महिला संघटनेच्या नेत्या तथा समाजसेविका रुक्मिणी नागापुरे यांना यशस्वीनी सन्मान पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला यावेळी संपादक बालाजी जगतकर, पत्रकार आयेशा शेख दिसत आहेत.

# ई-केवायसी केल्याशिवाय राशन मिळणार नाही !!




**नाशिक/सुरेश इंगळे**
रेशन वितरणातील अनियमिततेच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्यामुळे अन्न व नागरी पुरवठा विभाग सतर्क झाल्याचे दिसून आले आहे. सार्वजनिक वितरण प्रणालीनुसार स्वस्त मोफत धान्याचा लाभ घेत असलेल्या लाभार्थींना ई-केवायसी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. जिल्ह्यात आतापर्यंत केवळ ४०% कार्डधारकांनीच केवायसी केलेली असल्याचे निदर्शनास आले. अन्नसुरक्षा योजनेत पारदर्शकता आणण्यासाठी सर्व योजनेतील रेशन कार्डधारकांनी प्रत्येक ई - केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. जिल्ह्यात २००० रेशन दुकानदारापैकी अनेकांनी केवायसी होत नसल्याची तक्रार केली आहे अनेकांचे आधार कार्ड रेशन कार्ड ला लिंक नसल्याने त्यांची ही समस्या येत आहे बऱ्याच ठिकाणी रेंज नसल्याने केवायसी साठी मुदत वाढवून देण्याची मागणी करण्यात आली असल्याची माहिती स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष निवृत्त कापसे यांनी दिली आहे. ज्या लाभार्थीने अजून केवायसी केलेली नसेल, त्यांनी आपल्या रेशन दुकानदाराकडे जाऊन किंवा तहसील मध्ये संपर्क साधून आधार कार्ड सोबत घेऊ ही प्रक्रिया पूर्ण करून घेण्याचे आवाहन जिल्हा पुरवठा विभागाने केले आहे.

संपादकीय

## आला पावसाळा

जून , जुलै महिन्यामध्ये
होतात घन सगळं काळा
रिमझिम सरी बरसतात
खरचं आला पावसाळा

पाऊस पडला की भुवर
शेतकरी माझा सुखावतो
रानमाळ हिरवंगार करून
आपलं घर सुंदर सजवतो

थुई थुई नाचुनी पोर शाळेत
जातात पावसात भिजुनी
पावसात मज्जा येते पोरांना
मुखावर येते हसू ओलेचिंब
होऊनी

मित्र मैत्रिणी सोबत पियावा
पावसात टपरीवरचा चहा
खायला गरम भजी आहे
आस्वाद मस्त येतो हो पहा

प्रमोद न सूर्यवंशी
मुंबई
संपर्क - 9892353151

# बहुजनांना शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही- छ.शाहू

राजर्षी शाहू महाराजांची विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी भेट झाली. बाबासाहेबांच्या मूकनायक या वृत्तपत्रास व पुढे त्यांच्या इंग्लंडमधील उच्चशिक्षणास त्यांनी अर्थसाहाय्य केले. माणगाव व नागपूर येथील अस्पृश्यता निवारण परिषदांत त्यांच्याबरोबर सहभागी होऊन अस्पृश्यांना त्यांचा खरा पुढारी मिळाल्याबद्दल त्यांनी त्यांचा गौरव केला. अस्पृश्यतेबरोबरच जातिभेदाशी त्यांनी अखेरपर्यंत संघर्ष केला. आंतरजातीय विवाह हा जातिभेदावर रामबाण उपाय वाटून त्यांनी आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. स्वत: पुढाकार घेऊन अनेक आंतरजातीय विवाह घडवून आणले. तसेच बालविवाहास प्रतिबंध करून नोंदणी विवाहाचा कायदा जारी केला. घटस्फोटास व विधवापुनर्विवाहास कायदेशीर मान्यता दिली. कुटुंबात होणाऱ्या शारीरिक व मानसिक छळांपासून स्त्रीला संरक्षण देणारा कायदाही त्यांनी मंजूर केला. मागासलेल्या वर्गांतील मुलींना व स्त्रियांना मोफत शिक्षणाची सुविधा निर्माण केली. आपली राजकीय कारकीर्द समस्त समाजांना न्याय देण्यात खर्ची घातली होती, म्हणूनच त्यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून उत्साहाने साजरी केली जाते.

सामाजिक सुधारणांबरोबरच त्यांनी शेतीस व उद्योगधंद्यांस प्रोत्साहन दिले. अनेक कृषी व औद्योगिक प्रदर्शने भरविली. पन्हाळ्यावर चहा, कॉफी, रबर यांच्या लागवडींचे प्रयोग केले. कृषी उत्पादनासाठी शाहूपुरी, जयसिंगपूर यांसारख्या बाजारपेठा वसविल्या. त्यामुळे कोल्हापूर ही गुळाची बाजारपेठ म्हणून देशात प्रसिद्ध पावली. शाहूंनी कोल्हापुरात कारखानदारीचा पाया रचला. शाहू मिलची स्थापना करून आधुनिक वस्त्रोद्योगास त्यांनी चालना दिली. शाहूंनी बांधलेले राधानगरीचे धरण कृषी क्षेत्रात संस्थानचा कायापालट करणारा उपक्रम ठरला. संस्थानी मुलखातील हे सर्वांत मोठे धरण बांधून त्यांनी आपले संस्थान सुजलाम्-सुफलाम् करून टाकले. त्यांनी सहकारी संस्थांचा कायदा करून सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली.

छत्रपती शाहू महाराज कोल्हापूर महाराष्ट्रातील करवीर तथा कोल्हापूर संस्थानचे प्रागतिक अधिपती आणि थोर समाजसुधारक होत. प्राथमिक शिक्षण, जातिभेद-निवारण, अस्पृश्यता-निवारण आदी सुधारणांचे पुरस्कर्ते होते. त्यांचा जन्म दि.२६ जून १८७४ रोजी कागलच्या जहागीरदार घाटगे घराण्यात जयसिंगराव आणि राधाबाई या दांपत्याच्या पोटी झाला. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव यशवंतराव होते. चौथ्या शिवाजींच्या अकाली निधनानंतर ते दि.१७ मार्च १८८४ रोजी कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले. राजकोट व धारवाड येथे त्यांचे शिक्षण झाले. सर फ्रेझर व रघुनाथराव सबनीस यांसारखे गुरू त्यांना मिळाले. विद्यार्थिदशेत त्यांनी इंग्रजी, संस्कृत, इतिहास, राज्यशास्त्र इ. विषयांचा अभ्यास केला. त्यांना दि.२ एप्रिल १८९४ रोजी राज्याधिकार प्राप्त झाला. तत्पूर्वी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या कन्येबरोबर सन १८९१ साली त्यांचा विवाह झाला. त्यांना राजाराम व शिवाजी हे दोन मुलगे आणि राधाबाई-आक्कासाहेब व आऊबाई या दोन कन्या झाल्या. त्यांनी प्रशासन-यंत्रणेनची पुनर्रचना करून बहुजन समाजातील कर्तबगार व गुणी व्यक्तींना अधिकारावर नेमण्यास सुरुवात केली. सन १८९७-९८ साली प्रथम दुष्काळ व नंतर प्लेग अशी संकटे कोसळली.

मागासलेल्या जातींत शिक्षणाबद्दल फारशी आस्था नसल्याने व त्याचे कारण शिक्षण घेऊनही सरकारी नोकरी लाभण्याची शक्यता नसल्याने त्यांनी दि.२६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानातील ५० टक्के शासकीय नोकऱ्या मागास वर्गासाठी राखीव ठेवल्याचा जाहीरनामा काढला. राखीव जागांचे धोरण अमलात आणणारे ते भारतातील पहिले राज्यकर्ते ठरले. अस्पृश्यतेचे उच्चाटन हे आपले जीवितकर्तव्य मानले. संस्थानातील शाळा, पाणवठे, विहिरी, दवाखाने, कचेऱ्या आदी सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळण्यास त्यांनी कायद्याने प्रतिबंध केला. त्यासाठी अनेक वटहुकूम जारी केले. त्यांनी अस्पृश्यांना सरकारी नोकरीत घेतले. समाजातील तलाठ्यासारख्या प्रतिष्ठेच्या जागा दिल्या. त्यांच्यापैकी अनेकांना माहूत, हूलस्वार, पोलीस, स्वत:चे मोटारचालक म्हणून नेमले. भटक्या व विमुक्त जातींना जवळ करून त्यांचे जीवन स्थिर केले. त्यांना आपले रक्षक म्हणून नेमले. खेड्यापाड्यांतील बलुतेदारांनाही त्यांच्या बलुतेपद्धतीतून मुक्त करून त्यांना समाजातील सर्व उद्योगधंदे खुले केले. जोगिणी व देवदासी प्रथेस प्रतिबंध करणारा कायदा जारी केला.

सन १९०२ साली सातव्या एडवर्डच्या राज्यारोहणानिमित्त त्यांनी युरोपचा दौरा केला. तेथील भौतिक प्रगतीचा मोठा प्रभाव त्यांच्यावर पडला; त्यामुळे त्यांचे अनुभवविश्व समृद्ध झाले. बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दारिद्र, अज्ञान व अंधश्रद्धा नष्ट होणार नाहीत, हे जाणून त्यांनी शिक्षणाच्या, विशेषत: प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला. त्यानुसार त्यांनी आपल्या संस्थानात सन १९१७मध्ये सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला आणि तो अमलात आणला. प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू केली. ते शिक्षणसम्राट महात्मा फुलेंच्या सत्यशोधक विचारसरणीकडे आकृष्ट झाले. सत्यशोधक तत्त्वांना त्यांचा पाठिंबा होता. मराठ्यांसाठी सन १९२०मध्ये स्वतंत्र क्षात्र जगद्गुरू पद निर्माण करून त्यावर सदाशिवराव पाटील या उच्चविद्याविभूषित तरुणास नेमले. त्यांनी संगीत, नाट्य, चित्रकला, मल्लविद्या आदी कलांना राजाश्रय देऊन महाराष्ट्रात कलेच्या क्षेत्रात स्पृहणीय कामगिरी केली. अनेक गायक-गायिकांनी त्यांच्या आश्रयाने भारतभर कीर्ती संपादन केली. त्यांनी अनेक नाटक कंपन्यांना व गुणी कलावंतांना आश्रय दिला. मल्लविद्येच्या प्रांतात त्यांनी संस्थानासह सर्व देशांतील मल्लांना उदार आश्रय दिला. रोमच्या आखाड्याच्या धर्तीवर कोल्हापुरात कुस्तीचे मैदान बांधले. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर ही मल्लविद्येची पंढरी बनली. दस्तूरखुद्द महाराज हे मल्लांचे मल्ल म्हणून प्रसिद्ध होते. पट्टीचा शिकारी म्हणून त्यांचा लौकिक होता. छ.शाहूंच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून कानपूर येथे कुर्मी क्षत्रिय सभेने सन १९१९ साली त्यांना राजर्षी पदवी बहाल केली. त्यांच्या कार्यामुळे दलित-पतितांचा उद्धारक, रयतेचा राजा म्हणून त्यांची प्रतिमा जनसामान्यात निर्माण झाली. या राजाने अज्ञानी बहुजन समाजाला जागृत करण्याचे व्रत अखेरपर्यंत सांभाळले.

अखेरच्या दिवसांत द्वितीय चिरंजीव शिवाजी यांच्या अपघाती निधनाने सन १९१८मध्ये ते खचून गेले, तशातच मधुमेहाने ते ग्रासले होते. अखेर मुंबई येथे दि.६ मे १९२२ रोजी त्यांचे वयाच्या अवघ्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यानंतर त्यांचे पुत्र राजाराम महाराज कोल्हापूरच्या गादीवर आले. !! सामाजिक न्याय दिन व पावन जयंतीनिमित्त त्यांना व त्यांच्या लोककल्याणकारी कार्यांना मानाचा लवून मुजरा !!

**श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी- अलककार.**
**(भारताच्या वैभवशाली इतिहास-अस्मितेचे गाढे अभ्यासक.)**
**मु. रामनगर वॉर्ड नं.२०, गडचिरोली.**
**जि. गडचिरोली,**

# नीट घोटाळा ; लातूरमधील मुख्याध्यापक घेत ५० हजार ॲडव्हान्स, संपूर्ण डिल ५ लाखांची

**लातूर/प्रतिनिधी** नीट आणि यूजीसी घोटाळ्यातील आरोपी जलील पठाण याला ७ दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. नीट परीक्षेतील विद्यार्थ्यांना गुण वाढवून देण्याचा आरोप जलील पठाण आणि त्याच्या सहकाऱ्यावर करण्यात आला आहे. नीट परीक्षा गैरव्यवहार प्रकरणात लातूर पोलिसांचा वेगाने तपास सुरू आहे. जलील पठाण आणि संजय जाधव या दोन शिक्षकांसह चार जणांवर गुन्हा दाखल झाल्यानंतर आणखी दोन जणांना पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. आतापर्यंत या प्रकरणात सहा जणांचा सहभाग दिसून येत आहे. त्यातील जलील पठाण याला २ जुलै पर्यंत न्यायालयाने पोलीस




कोठडी सुनावली आहे. तर संजय जाधव यालाही अटक करण्यात आली आहे. तसेच आणखी दोघांना पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.धाराशिवमध्ये आयटीआय सुपरवायझर असलेला इरना कोनगलवार आणि दिल्लीचा गंगाधर मुंडे या दोघांचा शोध सुरू आहे. ५० हजार रुपये ॲडव्हान्स नीट गैरव्यवहार प्रकरणात आतापर्यंत सहा जणांचा संबंध जोडला गेला आहे. जलील पठाण आणि संजय जाधव यांच्याकडून पोलिसांनी मोबाईल सेटसह काही कागदपत्रे ताब्यात घेतली आहेत. प्राथमिक माहितीनुसार पाच लाख रुपयांच्या मोबदल्यात नीटचा पेपर लिक करण्यात येत होता. गुणवाढीसाठी दिल्लीतील आरोपी गंगाधर याच्याशी संपर्क करुन उमरगा आयटीआयमधील इरण्णा कोनगलवर दोघ शिक्षकांकडून प्रवेशपत्र मागवून घेत होता. त्यासाठी ५० हजार रुपये ॲडव्हान्स म्हणून घेतले जात असल्याची माहिती आहे. लातूर पोलिसांनी या प्रकरणात कमालीची गोपनीयता बाळगली असून वेगाने तपास सुरू आहे. लवकरच पोलिसांच्या ताब्यात असलेल्या जलील पठाण आणि संजय जाधव या दोन शिक्षकांना गंगाधर मुंडे यांच्या शोधासाठी दिल्लीला घेऊन जातील अशी शक्यता आहे.

### जलील पठाण याला 7 दिवसाची पोलीस कोठडी

नीट आणि यूजीसी घोटाळ्यातील आरोपी जलील पठाण याला ७ दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. नीट परीक्षेतील विद्यार्थ्यांना गुण वाढवून देण्याचा आरोप जलील पठाण आणि त्याच्या सहकाऱ्यावर करण्यात आला आहे. त्याला सोमवारी कोर्टात उभे करण्यात आले होते. पोलीस प्रशासनाने १० दिवसांची कोठडी मागितली होती. मात्र कोर्टाने ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# विद्यार्थ्यांच्या भोजनात १५ आरोग्यदायी पदार्थांचा समावेश फक्त कागदावरच !

**अंबाजोगई/परवेज पटेल**
प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासुन पोषण आहारामध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या १५ पाककृती निश्चित करण्यात आल्या असुन ३ संरचित आहार पद्धती नुसार व्हेजिटेबल पुलाव, नाचणी सत्त्व, अंडा पुलाव, तांदळाची खिचडी अशा पदार्थांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची खिचडीपासुन सुटका होणार असुन निश्चित केलेल्या पाककृती मध्ये व्हेजिटेबल पुलाव, अंडा पुलाव, मसाले भात, मोड आलेली मटकीची उसळ, मटार पुलाव, गोड खिचडी, मुगडाळ, खिचडी, चवळी खिचडी, मुग, शेवगा, वरण भात,



तांदळाची खीर, चणा पुलाव, नाचणीचे सत्त्व, सोयाबीन पुलाव, मोड आलेले कडधान्य आदी. १५ पदार्थांचा आस्वाद घेता येणार असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात येत आहे मात्र वस्तुस्थिती वेगळीच असुन सद्यस्थितीत तांदळापासून बनविलेल्या पाककृतीच्या स्वरूपात पोषण आहार दिला जात आहे. शालेय पोषण आहार पुरवठादार महाग वस्तुंची कमतरता दाखवून स्वस्त असणा-या मटकी, हरभरा, वाटाणा, मसुर, मुगदाळ यांचाच शाळांना पुरवठा करण्यात येत आहे. केंद्र शासनाने दिलेल्या सुचनेनुसार विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या आहारामध्ये स्थानिक पातळीवर उपलब्ध अन्नधान्य, तृणधान्य व अन्य पदार्थांचा समावेश करून आहाराचा दर्जा आणि पौष्टिकता वाढविणे, आहारात वैविध्य आणण्यासाठी पाककृती सुधारणा समिती नियुक्त करण्यात आली होती उन्हाळ्यात प्यायला पाणी नाही २०२३-२४ दुष्काळग्रस्त जिल्हा जाहिर झाल्याने २२ एप्रिल ते ३० एप्रिल मुलांना कोरडे धान्य वाटप करावे शाळेत वाटप ते पण केलेले नाही परसबागेतील भाजीपाला आहार मिळणार कसा ? शिक्षण विभागाकडून पात्र शाळांमध्ये निर्माण के जात असलेल्या परसबागातुन उत्पादीत भाजीपाला, फळे यांचा समावेश विद्यार्थ्यांच्या आहारात होत असल्याने विद्यार्थ्यांना ताजा, सक आहार मिळण्यास मदत होत असल्याचे नमूद के आहे. मात्र जिल्ह्यातील किती शाळांमध्ये परस आहे आणि मुख्य म्हणजे उन्हाळ्यात विद्याथ्य प्यायला पाणी नाही आणि परसबाग कशी जग असा प्रश्न शाळेतील शिक्षकांनी उपस्थित केल केवळ कागदावर छान असणारी योजना वास्त मात्र उतरताना दिसत नाही.

# कुटे चा कोठडीतील मुक्काम वाढला

## फसवणुकीचा गुन्हा दाखल होण्याचे सत्र सुरूच



**बीड/ प्रतिनिधी**
ठेवीदारांची फसवणूक केल्याने ज्ञानराधा चे सुरेश कुटे यांना शिवाजीनगर पोलीसानी अटक केली असता आज बीड न्यायालयात हजर केले असता पोलिसांनी आणखी माहितीसाठी सहा दिवसाच्या pcr मागवला असता न्यायालयाने कुटे यांचा तीन दिवसांचा पीसीआर देण्यात आला त्यामुळे शिवाजीनगर पोलिसांनी कोठडीत रवानगी केली आहे. यावेळी बीड न्यायालयात ठेवीदार मोठ्या संख्येने जमा झाले होते, त्यामुळे पोलिसांनी कुटे ना मागच्या दाराने व्हॅन मध्ये बसून नेले. कुटे ना ताब्यात घेण्यासाठी बीड न्यायालयात पैठणचे पोलीस देखील दाखल झाले होते.

# गंगापुर मल्लिकार्जुन कंपनीचा सुरक्षारक्षक पत्र्याच्या शेड वरून पडल्याने ठार

## कंपनी व्यवस्थापनावर गुन्हा दाखल करण्याची नातेवाईकांची मागणी

गंगापूर/प्रा संजय तुपे
गंगापूर तालुक्यातील बाबरगाव शिवारातील मल्लिकार्जुन कंपनीमध्ये सुरक्षा रक्षकाचे काम करत असताना सागर गौतम गायकवाड वय वर्षे २४ हा शेडवरुन पडल्याने ठार झाला असून या घटनेला कारणीभूत असलेल्याकंपनी व्यवस्थापन व संबंधिता विरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी नातेवाईकांनी गंगापूर पोलीस ठाण्यात जोरदार शक्ती प्रदर्शन केलं.यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले असून या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी नातेवाईकांनी केली आहे. सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार गंगापूर तालुक्यातील मांजरी येथील शेतकरी सागर गौतम गायकवाड (वय २४) हे गंगापूर ते छत्रपती संभाजीनगर रोडवरील बाबरगांव शिवारातील मल्लिकार्जुन कंपनीमध्ये सुरक्षा रक्षक म्हणून मल्लिकार्जुन या खासगी कंपनीत काम करत आहे ते २३ जुन रोजी रात्रपाळीला मल्लिकार्जुन कंपनीमध्ये गेलेअसता रात्री सात वाजेच्या सुमारास ते



काहीतरी कामासाठी कंपनीच्या पन्नास फूट उंच असलेल्या पत्र्या शेडवर चढून काम करत असताना अचानक खाली पडले त्यांच्या डोक्याला मार लागल्याने ते गंभीर जखमीझाले त्यांना कंपनीतील काही रखवालदार व कर्मचाऱ्यांनी उचलून येथील उपजिल्हारुग्णालयात दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. २४ जुन रोजी सकाळी सागर गायकवाड यांचेआई वडील व इतर नातेवाईक पोलीस ठाण्यात दाखल झाले. व त्यांनी मल्लिकार्जुन कंपनी व सिक्युरीटी कंपनीच्या विरोधातखुनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. बघता बघता पोलीस ठाण्यात त्यांचे नातेवाईक मोठया प्रमाणात जमले. दरम्यान नातेवाईकांनी गुन्हा दाखल करत नाहीतोपर्यंत मृतदेहांवर अंत्यसंस्कार करणार नसल्याचा पवित्रा घेतला. पोलीसांनी आईवडील व नातेवाईकांची समजूत घातल्याने मांजरी येथील स्मशानभूमीत मृतदेहांवरअंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रकरणी गंगापूर पोलिस स्टेशनमध्ये अकस्मात मृत्यूचीनोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक सत्यजित ताईतवाले,पो.हे.कॉ. दत्तात्रय अवधूत हे करत आहे.

# नगरपालिकेचा हलगर्जीपणा नागरिकांच्या जीवावर बेतणार! शहरातील प्रमुख मार्गावर मोकाट जनावरे ठाण मांडून बसू लागले!

## बंदोबस्त करा; नसता नगरपालिका कार्यालयात जनावरे बांधणार-वर्षाताई जगदाळे

**बीड/प्रतिनिधी**
नगरपालिकेच्या प्रशासकीय राज मुळे बीडकरांच्या डोळ्यात अश्रू आणले आहेत, शहरात घाण व कचऱ्याचे ढिगारे सर्वत्र पसरले आहेत, यातच मोकाट जनावरांच्या प्रश्न ऐरणीवर आला आहे. प्रमुख मार्गावर जनावरांचे थवे बसत आहेत यामध्ये गाई, बैल, भैस, यासह कुत्र्यांनी उच्छाद मांडला असल्याने पायी चालणाऱ्या नागरिकासह दुचाकी व चार चाकी वाहन धारकांनाही त्रास सहन करावा लागत आहे. मोकाट जनावरांचा बंदोबस्त नगरपालिकेने तात्काळ न केल्यास नगरपालिका कार्यालयात जनावरे बांधणार असल्याचे मनसे प्रदेश उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांनी म्हटले आहे. शहरातील प्रमुख मार्गावर मोकाट जनावरे मोठ्या संख्येने बसत असल्याने रहदारीला अडथळा निर्माण होत आहे. नगरपालिकेच्या कोंडवाडा विभागाने शहरातील मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी अनेक वेळा नगरपालिका प्रशासनाकडे करण्यात आलेली आहे मात्र याची दखल नगरपालिकेकडून घेण्यात आलेली नाही. शहरात मोठ्या प्रमाणात मोकाट जनावरे फिरत आहे याचा बंदोबस्त कोण करणार मोकाट कुत्र्यामुळे शालेय विद्यार्थ्यांना सर्वात अधिक धोका निर्माण होत आहे .याकडे नगरपालिका प्रशासन गांभीर्याने पाहत नसल्याने नगरपालिकेच्या विरोधात जन आंदोलन उभे करत नगरपालिका कार्यालयातच शहरातील मोकाट जनावरे बांधण्यात येणार असल्याचा इशारा मनसे राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी नगरपालिकेला दिला आहे.



# कोकणदीप वर्धापन दिन उत्साहात साजरा !

नुकताच मुंबईत प्रा.सुरेंद्र गावस्कर सभागृहात दादर येथे “कोकणदीप २२ वा वर्धापन दिन” मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.
कार्यक्रमाच्या सुरुवातीला कवी भूषण विलास देवळेकर यांनी काही कविता सादर करुन प्रेक्षकांची दाद मिळवली. त्या नंतर समारंभाध्यक्ष मा श्री सुधीरभाऊ कदम (शिवसेना संपर्कप्रमुख दापोली विधानसभा),डॉ. सुकृत खांडेकर (संपादक दै.प्रहार), सौ.साक्षी नाईक (प्रसिद्ध अभिनेत्री सिने-नाट्य), दिपेन्द्र पारदुले (उद्योजक), आणि श्री माणिकप्रभू अग्रहारकर (समाजसेवक-लेखक) इ. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून, सरस्वती देवीच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून, कोकणदीप मंचावर आगमन झाले.त्या वेळी, जनजागृती साठी विलास देवळेकर लिखित “हा खेळ निसर्गाचा आणि कोकण दीप स्वागत गीत”,जेष्ठ गायक व संगीतकार एकनाथ धयाळकर यांनी आपल्या सुमधुर आवाजात गीत सादर केले.त्यास उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात पसंती दिली. त्या नंतर,मान्यवरांना ‘शाल व पुष्पगुच्छ’ देऊन



# जेष्ठ गायक व संगीतकार धयाळकर यांना पुरस्कार प्रदान !

नुकताच मुंबईत प्रा सुरेंद्र गावस्कर सभागृहात दादर येथे “कोकण दीप २२वा वर्धापन” दिनानिमित्त जेष्ठ गायक व संगीतकार एकनाथ धयाळकर यांना संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बद्दल प्रसिद्ध सिने- नाट्य अभिनेत्री सौ साक्षी नाईक यांच्या हस्ते सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन ‘मुंबई रत्न’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# योगेश्वरी देवल कमेटीवरील नवीन विश्वस्त मंडळा विषयी भाविकात आक्षेप

## कार्यकारिणीच्या बैठकीत १४ ठराव मंजूर.. एक जुलैपासून महाराष्ट्रभर दौरा करून आंदोलन करणार-राजू शेट्टी

**अंबाजोगाई / प्रतिनिधी**

बीड येथील सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांनी नियुक्त केलेल्या श्री योगेश्वरी देवल कमेटीवर नवीन विश्वस्त मंडळा विषयी भाविकात आक्षेप घेतला असुन या निवडीच्या विरोधात न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय घेतला आहे. शहरातील सर्व पक्षिय समितीच्या वतीने योगेश्वरी देवीची महाआरती करून आंदोलनाचे रणशिंग फुंकल्या गेले.

संपूर्ण महाराष्ट्राची कुलस्वामिनी असलेल्या अंबाजोगाईच्या श्री योगेश्वरी देवीच्या विश्वस्त मंडळाची मुदत संपल्या मुळे नवीन विश्वस्त मंडळ भाविका मधून निवड करण्याचे आदेश मा. न्यायालयाने बीड येथील सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांना दिले. या आदेशानुसार विश्वस्त नियुक्त करण्यासाठी सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांनी अंबाजोगाई शहरातील स्थानिक रहवासी आसलेल्या भक्तांना विविध निकष लावून अर्ज मागवले. त्यामुळे एकूण १११० भक्तांनी अर्ज दाखल केले होते. अर्ज दाखल केलेल्या पैकी २३७ अर्ज सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांनी त्रुटीमध्ये काढल्याने होते. त्यातील ८७३ भक्तांची निवड केली त्यात बीड येथील सहाय्यक धर्मदाय आयुक्त कार्यालयात ३५० च्या जवळपास भक्तांनी बीड येथे जाऊन मुलाखती दिल्या.निवड झालेल्या या नवीन विश्वस्था विषयी भविकानी शंका उपस्थित केल्या आहेत. विश्वस्त म्हणून नवीन नियुक्ती देताना मागील १६ पैकी १० जणांना कमी करण्यात आलेले आहे तर नव्याने निवड झालेल्या विश्वस्ता मध्ये आजी व माजी आमदार, माजी नगराध्यक्ष, एक न्यायालयीन तक्रारदार यांच्या सह एकाच व्यक्तीच्या समावेश आहे. नव्याने निवड करण्यात आलेल्या विश्वस्तामध्ये योगेश्वरी देवीशी निगडित पारंपरिक सेवा करणारा पुजारी, पौरोहित्य करणारा पुरोहित, पालखी उचलणारा भोयी, नवरात्र व अन्य उत्सवात सेवा देणारा कलावंत, गोंधळी, सेवेत असणंऱ्या बारा बलुतेदारा पैकी एक, मागासवर्गीया पैकी एक यांच्या सारख्या व्यक्तीचा



समावेश असता असला पाहिजे होता असा सूर निघत आहे.

एकूणच सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांनी नियुक्त केलेल्या या नवीन विश्वस्त मंडळाविषयी भाविकात तीव्र नापसंती व्यक्त करत असुन या निवडीच्या विरोधात न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय काही भाविकांनी घेतला आहे.

दरम्यान सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांनी केलेल्या निवडीच्या विरोधात अंबाजोगाई शहरातील सर्व पक्षीय समितीच्या वतीने सर्व प्रथम श्री योगेश्वरी देवीची महा आरती करण्यात आली व त्या नंतर मंदीराबाहेर येऊन सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांच्या विरोधात निषेधाच्या घोषणा देऊन आंदोलन करण्यात आले.

या वेळी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते दिलीप सांगळे, माकपचे कॉ. बब्रुवान पोटभरे, लोकजनशक्ती पार्टीचे राजेश वाव्हळे, शिवसेना उबाठा गटाचे तालुका प्रमुख बालासाहेब शेप, शहर अध्यक्ष अशोक हेडे, अशोक गाढवे, बाबा भिसे, भीमराव सरवदे, श्रीपाद डांगे,अनंत अरसुडे, बाळासाहेब वाघाळकर, बालाजी चाटे, मनोज वाघमारे, सूरज वाघमारे, डॉ.नयना सिरसाट, रेखा घोबाळे, सुनिता जाधव, जयश्री पिंपरे, जयश्री मोरे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# दक्षिण आफ्रिकेने इंग्लंडला केले पराभूत, उपांत्य फेरीच्या आशा केल्या बळकट

मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) : क्विंटन डी कॉकची शानदार फलंदाजी आणि गोलंदाजांच्या दमदार कामगिरीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेने गतविजेत्या इंग्लंडला एका रोमहर्षक सामन्यात ७ धावांनी पराभूत करून सुपर-८ टप्प्यात सलग दुसऱ्या विजयाची नोंद केली. प्रथम फलंदाजी करताना क्विंटन डी कॉकच्या ६५ धावांच्या खेळीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेने २० षटकांत ६ गडी गमावून १६३ धावा केल्या, प्रत्युत्तरात ब्रूकने ३७ चेंडूत ५३ धावांची खेळी करत संघाला अडचणीतून सोडवले. त्याने आपली विकेट गमावली आणि इंग्लंडला पराभवाचा सामना करावा लागला.



इंग्लंडच्या संघाला २० षटकांत ६ बाद १५६ धावाच करता आल्या. दक्षिण आफ्रिकेकडून कागिसो रबाडा आणि केशव महाराज यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. सुरू असलेल्या विश्वचषकात दक्षिण आफ्रिकेच्या संघाने दमदार कामगिरी केली आहे. त्यांनी ड गटातील त्यांचे चारही सामने जिंकले आणि आता सुपर-८ मधील त्यांचे पहिले दोन्ही सामने जिंकले आहेत. याआधी दक्षिण आफ्रिकेने अमेरिकेचा पराभव केला होता. या विजयासह दक्षिण आफ्रिकेच्या उपांत्य फेरीच्या आशा बळकट झाल्या आहेत. दक्षिण आफ्रिका दोन सामन्यांतून दोन विजयांसह चार गुणांसह गट-२ मध्ये अव्वल स्थानावर आहे. या पराभवानंतरही इंग्लंडचा संघ दोन सामन्यांतून एक विजय आणि एक पराभवासह दोन गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरुवात चांगली झाली नाही

# वांद्रे सेंट टेरेसा शाळेत योग दिन उत्साहात संपन्न..

.मुंबई प्रतिनिधी...गणेश हिरवे...वांद्रे येथील सेंट टेरेसा बॉईज हायस्कूल येथे जागतिक योग दिनाच्या पार्श्वभूमीवर इयत्ता आठवी ड च्या विद्यार्थीनी आसने, प्राणायाम, योग पूरक हालचाली, प्रात्यक्षिके, इत्यादी आसने पी टी शिक्षिका संजीवनी गजरे यांचे मार्गदर्शनाखाली केली. योगामुळे आपले शरीर सुदृढ राहते, रोग प्रतिकारक शक्ती वाढते, शरीर निरोगी राहून बळकट बनते.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक फादर निकी, पी आर ओ फादर शिनॉय, उपमुख्यध्यापिका रोझ लोबो, पर्यवेक्षक फिलिप रॉड्रिग्ज, शिक्षक वर्ग आदी उपस्थित होते. शिक्षिका प्रिया हटकर यांनी योग दिनाचे महत्व सांगितले.प्रार्थनेने आजच्या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली होती.ॉ

# येडेश्वरी इंग्लिश स्कूलचा भव्य शुभारंभ

केज/प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे नवनिर्वाचित खासदार माननीय बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रेरणेने कै.भुजंगराव प्रतिष्ठान,सारणी आनंदगाव) संचलित येडेश्वरी इंग्लिश स्कूल युसुफवडगाव या इंग्लिश स्कूलचा उपविभागीय अधिकारी आंबेजोगाई मा. दीपक वजाळे साहेब यांच्या हस्ते भव्य शुभारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या येडेश्वरी इंग्लिश स्कूल च्या भव्य शुभारंभ कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय डॉ.बाळकृष्ण भवर बापू चेअरमन येडेश्वरी ॲग्रो प्रॉडक्ट आनंदगाव तथा कै. उपाध्यक्ष भुजंगराव सेवा प्रतिष्ठान सारणी, कार्यक्रमाचे उद्घाटक उपविभागीय अधिकारी आंबेजोगाई मा.दीपक वजाळे साहेब, प्रमुख उपस्थिती युसुफवडगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक माननीय मच्छिंद्र शेंडगे साहेब प्रमुख पाहुणे कै. भुजंगराव सेवा प्रतिष्ठान सारणी चे सहसचिव तथा सोमेश्वर शिक्षण संस्था जिरेवाडी सचिव मा. अड. गोपाळराव कांदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत येडेश्वरी इंग्लिश स्कूलचा भव्य समारंभ संपन्न झाला. यावेळी उद्घाटन प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना बीड जिल्ह्याचे नव निर्वाचित खासदार माननीय बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रेरणातून या येडेश्वरी इंग्लिश स्कूलचे उद्घाटन करण्याचे भाग्य मला लाभले. येडेश्वरी इंग्लिश स्कूल चे जेव्हा वटवृक्षात




रूपांतर होईल व जेव्हा इतिहास लिहिला जाईल त्या इतिहासामध्ये आपण चांगले काम केले होते. याचा निश्चित स्वाभिमान वाटेल आणि त्या अनुषंगाने प्राचार्य व शिक्षक कर्मचारी यांनी अथक व प्रमाणिक प्रयत्नातून विद्यार्थ्यांना ज्ञानदान करून येणाऱ्या भावी विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल करतील यात शंका नाही अशी अपेक्षा व्यक्त करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी सहाय्यक पोलीस निरीक्षक माननीय मच्छिंद्र शेंडगे साहेब यांनी या उजाड माळ रानात अतिशय थोड्या दिवसात येडेश्वरी इंग्लिश स्कूलच्या माध्यमातून हिरवळ निर्माण करून परिसरातील गोरगरीब पालकांना इंग्लिश मेडियम च्या माध्यमातून एक उच्च दर्जाचे शिक्षण संकुल उभारून जिल्ह्याचे खासदार माननीय बजरंग बप्पा सोनवणे यांनी मोठे पाऊल उचलले असून याचा निश्चित फायदा परिसरातील शिक्षणप्रेमींना होईल असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा ॲडव्होकेट गोपाळराव कांदे साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बीड जिल्ह्याचे खासदार माननीय बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रेरणेने या येडेश्वरी इंग्लिश स्कूल चे बीजारोपण झाले असून कोणतेही काम करत असताना, कोणताही प्रकल्प /प्रोजेक्ट तयार करताना त्याची सुरुवात छोट्या पासून होत असते तसं हे येडेश्वरी इंग्लिश स्कूल उभारले असून पुढील काळामध्ये अतिशय भव्य दिव्य व अद्यावत परिपूर्ण शैक्षणिक, व्यावसायिक,पॅरामेडिकल, इंजिनिअरिंग असे परिपूर्ण शिक्षण संकुल बीड जिल्ह्यात अग्रेसर असेल अशी हमी विद्यार्थी पालक शिक्षक कर्मचारी यांना दिली. अध्यक्ष समारोप करताना प्रा.डॉ. बाळकृष्ण भोर बापू भवर बापू यांनी कोणत्याही कामाची सुरुवात हे छोट्या मधून होत असते व त्याचे रूपांतर वटवृक्षात होत असते . वटवृक्षाची बीजे अतिशय सूक्ष्म असतात. याचे मूर्ती मंद उदाहरण हे बीड जिल्ह्याचे खासदार माननीय बजरंग बप्पा सोनवणे असून त्यांनी येडेश्वरी ॲग्रो प्रॉडक्ट च्या माध्यमातून केले असून आज येडेश्वरी परिवार सर्वांना परिचित आहे. या येडेश्वरी इंग्लिश स्कूलच्या माध्यमातून परिसरातील विद्यार्थी गुणवंत बनतील व परिसराचा काय पालट झाल्याशिवाय राहणार नाही याची ग्वाही दिली. पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी प्राचार्य सुशीलकुमार गायकवाड मुख्याध्यापक संजय कुलकर्णी सर येडेश्वरी इंग्लिश स्कूल चे प्राचार्य ओमप्रकाश खंडेलवाल परिसरातील व कारखान्यातील मान्यवर, पालक प्रतिनिधी, विद्यार्थी बालक शिक्षक कर्मचारी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री अशोक चौधरी सर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीत विशारद श्री. प्रसाद कुलकर्णी सर यांनी तर आभार प्रदर्शन इंग्लिश स्कूलचे प्राचार्य ओमप्रकाश खंडेलवाल यांनी केले.

दैनिक वादळ वार्ताहे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनूडिजिटल छापन संप ादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 के ज येथन तू यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित के ले आहे ( वाद के ज / बीड न्यायालय अंतर्गत )